**भारतीय हवामान खाते**

**कृषि हवामान प्रभाग, पुणे ४११००५**

**महाराष्ट्र राज्यासाठी कृषी हवामान सूचना पत्रक ९८ / २०२२**


**(सूचना पत्रकात दिलेला कृषी सल्ला राज्यातील कृषी हवामान केंद्रे व जिल्हा कृषी हवामान केंद्रे यांच्याकडून प्राप्त झालेला आहे)**


**दिनांक : ०९.१२.२०२२**


**दिनांक ०६ डिसेंबर ते ०८ डिसेंबर २०२२ या काळातील हवामानाचा सारांश :**


| **दिनांक** | **०६.१२.२०२२** | **०७.१२.२०२२** | **०८.१२.२०२२** |
|---|---|---|---|
| **कोकण व गोवा** | कोरडे | कोरडे | कोरडे |
| **मध्य महाराष्ट्र** | तुरळक | कोरडे | कोरडे |
| **मराठवाडा** | कोरडे | कोरडे | कोरडे |
| **विदर्भ** | कोरडे | कोरडे | कोरडे |

**राज्यातील हवामान घटकांचे वर्गीकरण ( दिनांक ०६ डिसेंबर ते ०८ डिसेंबर २०२२)**








Relative Humidity (%) over Maharashtra for the period of 06.12.2022 to 08.12.2022



Cloud amount (okta) over Maharashtra for the period of 06.12.2022 to 08.12.2022



Wind speed (knots) over Maharashtra for the period of 06.12.2022 to 08.12.2022



**दिनांक १४.१२.२०२२ च्या सकाळ पर्यंतचा हवामानाचा अंदाज:**

| **दिनांक** | **०९.१२.२०२२** | **१०.१२.२०२२** | **११.१२.२०२२** | **१२.१२.२०२२** | **१३.१२.२०२२** |
|---|---|---|---|---|---|
| **उत्तर कोकण** | कोरडे | कोरडे | तुरळक | काही | काही |
| **दक्षिण कोकण व गोवा** | तुरळक | काही | काही | बऱ्याच | काही |
| **उत्तर मध्य महाराष्ट्र** | कोरडे | कोरडे | तुरळक | काही | काही |
| **दक्षिण मध्य महाराष्ट्र** | कोरडे | तुरळक | काही | काही | काही |
| **मराठवाडा** | कोरडे | तुरळक | काही | काही | तुरळक |
| **विदर्भ** | कोरडे | तुरळक | तुरळक | तुरळक | तुरळक |

*** सविस्तर हवामान अंदाज सूची १ (Annexure I) मध्ये आहे.**

**कोकण विभाग -**

**( कृषी सल्ला कृषी हवामान केन्द्र दापोली, (जि. रत्नागिरी, रायगड, ठाणे) कृषी हवामान केन्द्र मुळदे (जि. सिंधुदुर्ग) आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र, पालघर (जि. पालघर) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने,
  - काढणी केलेल्या सुपारी सुरक्षित ठिकाणी वाळवाव्यात,
  - भुईमूग पिकांची पेरणी पुढे ढकलावी व नुकत्याच पेरणी केलेल्या व उगवण स्थितीत असणा-या भुईमुग पिकातुन पावसाच्या अतिरीक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी,
  - आंबा व काजू पिकावरील किड व रोग नियंत्रणासाठीच्या किटकनाशक व बुरशीनाशकांच्या फवारण्या पुढे ढकलण्यात याव्यात.
- टोमॅटो, वांगी, मिरची पुनर्लागवड केल्यानंतर यावर मुळ किंवा खोड कुज आणि मर रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे त्यामुळे रोप संरक्षणासाठी ५० ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हीरीडी या जैविक बुरशीनाशकाची प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी पावसाची उघडीप पाहून करावी.
- वेलवर्गीय पिकांवर केवडा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येवू शकतो, त्यासाठी कार्बनडयाझियम @ १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.

**( कृषी सल्ला कृषी हवामान केन्द्र, पुणे, (जि. पुणे, जळगाव) आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र, सोलापूर (जि. सोलापूर) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने, काढणी केलेल्या कापूस व भाजीपाला पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.
- हरभरा पीक पाणी साचण्याच्या बाबतीत अतिशय संवेदनशील असते ज्यामुळे पीक अचानक कोमेजून जाते म्हणून हरभरा पिकामध्ये पाणी साठणार नाही याची दक्षता घ्यावी व अतिरिक्त पावसाच्या पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.
- ढगाळ वातावरण व हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने द्राक्षे पिकावरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डायफेनकोनॅझोल २५ ईसी @ ५ मि.ली. किंवा पेनकोनॅसील १०% डीसी @ ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.

**( कृषी सल्ला कृषी हवामान केन्द्र, राहुरी (जि. अहमदनगर, धुळे) आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र नंदुरबार, (जि.नंदुरबार ) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने, वेचणी केलेला कापूस व काढणी केलेल्या कांदा पिकांची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.
- ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता असल्यामुळे,
  - हरभरा पिकात घाटेआळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. घाटेआळीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी एकरी चार कामगंध सापळे लावावेत तसेच २० पक्षीथांबे उभारावेत. घाटेअळीच्या नियंत्रणासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा अझाडीरेकटीन १५०० पी.पी.एम. ( ५ मि. ली./ लिटर पाणी) या जैविक किटकनाशाकाची पावसाची उघडीप पाहून फवारणी घ्यावी.

- भाजीपाला पिकांत रस शोषणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ईसी @ १५ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल @ ४ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.
- मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारे गंधक @ २५ ग्रॅम किंवा टेब्युकोनेझोल @ १० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.

**( कृषी सल्ला प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, कोल्हापूर (जि. कोल्हापूर, सांगली व सातारा) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- दिनांक ११ ते १४ डिसेंबर कालावधीत हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने,
  - काढणी केलेल्या शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा व जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावे.
  - गहू, कांदा, द्राक्षे, हळद, हरभरा पिकामध्ये पावसाचे पाणी साठू देणे टाळावे.

**मराठवाडा विभाग -**

**( कृषी सल्ला, प्रादेशिक कृषी हवामान केन्द्र, परभणी जि. परभणी, जालना, हिंगोली, बीड, लातूर, नांदेड आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र, औरंगाबाद ( जि. औरंगाबाद ), जिल्हा कृषी हवामान केन्द्र उस्मानाबाद ( जि. उस्मानाबाद ) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने,
  - वेचणीस तयार असलेल्या कापूस पिकाची वेचणी लवकरात लवकर करून कापसाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कापूस पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी,
  - पाऊस थांबल्यानंतर बागेमध्ये ब्लोअर फिरवून द्राक्ष गुच्छांमध्ये साठलेले पाणी निघून जाईल याची काळजी घ्यावी, गुच्छातील पाणी काढून टाकण्यासाठी फलोत्पादन ग्रेडच्या खनिज तेलाचा (मिनरल ऑईल) चा वापर करावा.
- मागील आठवड्यातील ढगाळ वातावरणामुळे,
  - वेळेवर पेरणी केलेल्या हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थानासाठी शेतामध्ये इंग्रजी **T** आकाराचे प्रति एकर २० पक्षी थांबे लावावेत व घाटेअळीच्या सर्वेक्षणासाठी प्रति एकरी २ कामगंध सापळे लावावेत. घाटे अळीच्या व्यवस्थानासाठी ५% (एनएसकेई) निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५ % इसी @ २० मि.ली. किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % @ ४.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.
  - वेळेवर लागवड केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % @ १३ मि.ली. किंवा असिफेट ७५ % @ १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.
  - कांदा पिकावरील पानावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी १० ते १५ दिवसांच्या अंतराने मॅन्कोझेब **@** २५ ग्रॅम किंवा डायथेन एम- ४५ **@** २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.

**पश्चिम विदर्भ :**

**( कृषी सल्ला प्रादेशिक कृषी हवामान केंद्र अकोला, जि. अकोला, यवतमाळ, वर्धा आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र, अमरावती ( जि. अमरावती ) जिल्हा कृषी हवामान केन्द्र, वाशीम ( जि. वाशीम ) जिल्हा कृषी हवामान केन्द्र, बुलढाणा ( जि. बुलढाणा ) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- तुरळक ठिकाणी हलका स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने, वेचणीस तयार असलेल्या कापूस पिकाची वेचणी लवकरात लवकर करून कापसाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कापूस पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.
- ढगाळ वातावरणामुळे,
  - तूर पिकांत शेंगा पोखरणारी अळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी,
  - वेळेवर पेरणी केलेल्या हरभरा पिकावरील घाटी अळीच्या व्यवस्थापनासाठी शेतात दर हेक्टरी २० पक्षी थांबे उभारावेत, पिकाची आर्थिक नुकसान पातळी (१-२ घाटेआळी प्रती झाड किंवा ५ टक्के नुकसान )असल्यास घाटे आळीच्या (हेलीकव्हरपा) च्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा आझाडीराकटिन ३०० पी पी एम प्रती ५० मी.ली. प्रती १० लिटर किंवा इमामेमेक्टीन बेन्झोएट ५ टक्के एस जी @ ४.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात फवारणी करावी.

**पूर्व विदर्भ :**

**( कृषी सल्ला कृषी हवामान केन्द्र सिंदेवाही, जि. चंद्रपूर, गोंदिया आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र, नागपूर(जि. नागपूर), जिल्हा कृषी हवामान केन्द्र, भंडारा (जि. भंडारा), आणि जिल्हा कृषी हवामान केन्द्र, गडचिरोली (जि. गडचिरोली) यांचे कडून प्राप्त झाल्यानुसार )**

- तुरळक ठिकाणी हलका स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने, वेचणीस तयार असलेल्या कापूस पिकाची वेचणी लवकरात लवकर करून कापसाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. कापूस पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी.
- उन्हाळी धान पिक पेरणीसाठी जमीनिची मशागत करावी.
- गहू पिकांची पेरणी १५ डिसेंबर पर्यंत सुरू ठेवावी.
- हरभरा, जवस, करडई, मोहरी पिकांत आंतर मशागतीची कामे करावी,
- हरभरा पिकावरील घाटे अळीच्या एकात्मिक व्यवस्थापणासाठी प्रती हेक्टरी २० पक्षी थांबे शेतामध्ये लावावे.
- कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के एएफ @ २५ मि.ली. किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के प्रवाही @ २५ मि.ली किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही @ २० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

